जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन
जिल्हा परिषद, नांदेड.
email: nbananded@gmail.com

जा.क्र.जिपनां/जिपावस्वमी/स्वभामी/ 34 /2022

दिनांक 11 / 01 /2023

## स्वच्छ भारत मिशन ग्रामीण टप्प्यात - 2 अंतर्गत व्यावसायिक संस्था/स्वयंसेवी संस्था म्हणून काम करु इच्छणि-या संस्थांची विहित नमुन्यात सुची तयार करण्यसाठी आवेदन

स्वच्छ भारत मिशन ग्रामीण टप्प्यात -2 अंतर्गत नांदेड जिल्ह्यात सन 2022-23 साठी निवडक ग्रामपंचायतीमधील गावामध्ये प्लास्टिक कचरा व्यवस्थापन प्रकल्प कामाकरिता सर्वेक्षण करणे, अंदाजपत्रके व प्रस्ताव तयार करणे, प्रकल्प आराखडे तयार करणे, पर्यवेक्षण करणे व तांत्रिक सल्ला / सहाय्यक प्रदान करणे करिता पाणीपुरवठा व स्वच्छता क्षेत्रातील काम करणाऱ्या व्यावसायिक संस्था/स्वयंसेवी संस्था यांच्याकडून खालील अटी व शर्तीच्या अधीन अर्ज मागविण्यात येत आहेत. याबाबत कामाचे प्रारूप अटी व शर्ती www.zpnanded.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

| | |
|---|---|
| अर्ज स्वीकारण्याची मुदत | दिनांक 16/01/2023 रोजी पासून पर्यंत दि. 24/01/2023 |
| अर्ज स्वीकृती चा पत्ता | पाणी व स्वच्छता मिशन कक्ष जिल्हा परिषद नांदेड. |

प्लास्टिक वेस्ट मॅनेजमेंट प्रकल्प आराखड्यामध्ये खालील बाबीचा समावेश असणे आवश्यक आहे.

1) प्लास्टिक श्रेडर मशीन (Plastic shredar machine)
2) प्लास्टिक बेलिंग मशीन (Plastic beling machine)
3) डस्ट रिमुव्हर मशीन ((Plastic Dust Remover machine)
4) प्लास्टिक कचरा व्यवस्थापन कक्ष शेड बांधकाम
5) गावातील प्लास्टिक कचरा संकलन पासून PMPU प्रक्रिया प्रकल्प पर्यंत वहन
6) प्लास्टिक कचऱ्याचे पुर्नचक्रीकरण व पुनर्वापर
7) प्लास्टिक कचरा व्यवस्थापन देखभाल व दुरुस्ती

सदर अंग/उपांग (Component) चा समावेश करून अद्यावत उपायासह तंत्रज्ञान वापरुन शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार 'सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR)' तयार करून कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणीपुरवठा यांच्याकडून तांत्रिक मान्यता प्राप्त करून सादर करण्यात यावा तांत्रिक मान्यता विविध प्रकल्प कार्यान्वयन टप्पा पूर्ण झाले वरच संपूर्ण देयक अदा करण्यात येईल.

Scanned with CamScanner

याकरिता इच्छुक अनुभवी संस्था यांच्याकडून खालील अटी व शर्तीचे अधीन राहून अर्ज मागविण्यात येत आहेत.

**अटी व शर्ती**

**अ) नोंदणी**

1) संस्था ही लागू असलेल्या अधिनियमाद्वारे नोंदणीकृत असावी.

2) सदर संस्थेकडे आयकर नोंदणी (पॅन कार्ड) वस्तू व सेवा करनोंदणी (GST) असावी.

3) मागील तीन वर्षाचे आयकर भरणा (I.T.Return) आणि वस्तू व सेवा कर भरणा केलेला असावा.

4) स्वच्छतेच्या क्षेत्रात शासकीय कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य जोडावे.

5) तांत्रिक कामाचा अनुभव असल्यास प्रमाणपत्र जोडावे तांत्रिक कामाचा अनुभव असलेली स्वतंत्र टीम टेक्निकल सपोर्ट प्रोव्हायडर टी एस पी ची यादी सोबत जोडावी.

6) व्यावसायिक संस्था स्वयंसेवी संस्था चे वार्षिक उलाढाल लक्षात नमूद करावे.

**ब) अनुभव -**

1) संस्थेस प्लास्टिक कचरा व्यवस्थापन/स्वच्छ भारत अभियान टप्पा -2 मध्ये समाधानकारक कामाचा अनुभव असावा तसे सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र सादर करण्यात यावे.

2) नांदेड जिल्ह्याचा अभ्यास व येथे संबंधित कामाचा अनुभव असणाऱ्या संस्थेस प्राधान्य देण्यात येईल.

**क) निवड प्रक्रिया**

1) प्राप्त अर्जातून छाननी करून अनुभवाचे आधारे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती द्वारे निवड करण्यात येईल.

2) प्राप्त कागदपत्रे आधारे निवड करणे शक्य होत नसल्यास संस्थांना समक्ष सादरीकरणासाठी बोलाविण्याचे अधिकार राखून ठेवण्यात येत आहेत.

**ड) कामाच्या अटी**

1) स्वच्छ भारत मिशन ग्रामीण टप्पा दोन अंतर्गत स्वच्छताविषयक कामाचा प्लास्टिक कचरा व्यवस्थापन कामाचा अनुभव असावा.

2) जागेची उपलब्धता/परवाने यांची खात्री करून प्रस्ताव सादर करावेत. तांत्रिक व प्रशासकीय मंजुरी मिळेपर्यंत त्यामध्ये होणाऱ्या बदलानुसार प्रस्तावातील बदल आहे त्याच किमतीत संस्थेला करावा लागेल

3) सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तपासणी करून दिलेल्या नमुन्यानुसार व बरोबर असल्याची खात्री करून वरिष्ठ कार्यालयाच्या परवानगीने व निर्देशानुसार, एम्पॅनेलमेंट अनुभवी संस्था/सेल्फ हेल्प ग्रुप/एनजीओ/ खाजगी संस्था यांनी सर्वेक्षण करणे, अंदाजपत्रकीय प्रस्ताव तयार करणे, आराखडे तयार करणे, पर्यवेक्षण करणे, तांत्रिक सल्ला/ सहाय्य प्रदान करणे या बाबी करिता जिल्हास्तरीय प्लास्टिक वेस्ट मॅनेजमेंट याकरिता प्रत्येकी अनुज्ञय निधीच्या 5% किंवा रुपये 100,000/- (अक्षरी एक लाख रुपये) फक्त यापैकी जी कमी असेल त्या रकमेच्या

Scanned with CamScanner

मर्यादेपर्यंत अनुभवी संस्था/सेल्फ हेल्प ग्रुप एनजीओ/खाजगी संस्था यांना शुल्क म्हणून शासन स्तरावरून निधी उपलब्ध झाल्यानंतरच अदा करण्यात येईल.

4) प्लास्टिक कचरा व्यवस्थापन चे काम करीत असताना केंद्र व राज्य शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णयामधील मार्गदर्शक सूचनानुसार काम करणे बंधनकारक आहे.

5)आदेशाच्या तारखेपासून 15 दिवसात सविस्तर प्रकल्पावर अहवाल (DPR) व अंदाजपत्रके करून या कार्यालयाकडे पुढील कारवाई करिता सादर करावेत.

6) सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणेस मुदतीपेक्षा जास्त विलंब झाल्यास संस्था दंडास पात्र राहील. (दंड किती आकारावयाचा याबाबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेश अंतिम राहतील.

7) वेळोवेळी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पावस्व)व कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणीपुरवठा) तसेच वरिष्ठ कार्यालयाने दिलेल्या सूचनानुसार कार्यवाही करावी लागेल.

8) निवड केलेल्या संस्थेने विहित रकमेच्या मुद्रांकावर करारनामा सादर करावा लागेल.

9) निवड केलेल्या संस्थांचे करार कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहेत.

| | | |
|---|---|---|
| प्रकल्प संचालक (जजीमी)<br>जिल्हा परिषद नांदेड | प्रकल्प संचालक (डीआरडीए)<br>जिल्हा परिषद नांदेड | 3/1/23<br>मुख्य कार्यकारी अधिकारी<br>जिल्हा परिषद नांदेड |

O/C

Scanned with CamScanner

महाराष्ट्र शासन

(जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन, जिल्हा परिषद, नांदेड )

स्वारस्य अभिव्यक्ती (EOI)

Expression Of Intrest Notice

**स्वच्छ भारत मिशन ग्रामीण टप्पा-2 अंतर्गत व्यावसायीक संस्था / स्वयंसेवी संस्था म्हणुन काम करू इच्छिणा-या संस्थांची विहित नमुन्यात सूची तयार करण्यासाठी आवेदन मागविणे आहेत.**

स्वच्छ भारत मिशन ग्रामीण टप्पा-2 अंतर्गत नांदेड जिल्यातील सन 2022-23 साठी 16 तालुक्यांमध्ये Plastic Waste Management प्रकल्पाच्या कामांकरिता सर्वेक्षण करणे, अंदाजपत्रके व प्रस्ताव तयार करणे, प्रकल्प आराखडे तयार करणे, पर्यवेक्षण करणे व तांत्रिक सल्ला /सहाय्य प्रदान करण्याकरिता पाणी पुरवठा व स्वच्छता क्षेत्रातील काम करणा-या व्यावसायीक संस्था/स्वयंसेवी संस्था यांच्या कडून अर्ज मागविण्यात येत आहे. याबाबत कामाचे प्रारूप, अटी शर्ती http://zpnanded.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

www. zpnanded.gov.in.

अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख दि.24 / 01 /2023 रोजी सायंकाळी 5.00 वा. पर्यंत.

पत्ता - जिल्हा परिषद नांदेड, रेल्वे स्टेशन रोड नांदेड.

प्रकल्प संचालक (जजीमी)
जिल्हा परिषद, नांदेड.

D:\Alkesh sir letter file 2021-22\Letter Sept 2022 1

Scanned with CamScanner